**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७७५/२०२५**
**जुना दावा क्र. १६३० / २०१९**
किसन वेताळ वि. रफिक सय्यद
निशाणी क्रमांक **३०** खाली
CNR No.MHOS140009452025

**अर्ज निशाणी ३९ वरील आदेशान्वये प्रतिवादीचा शपथेवर उलटतपास विधीज्ञ एस.डी. गटकुळ यांच्यामार्फत**

१. माझे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. माझा चारचाकीगॅरेजचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी करत असलेल्या व्यवसायामुळे माझा वादीसोबत परिचय झाला होता. खरेदीदस्त होण्याच्या दीड महिन्यापूर्वी माझी वादीशी ओळख झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझा सावकारीचा देखील व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ५ टक्के दराने गरजू लोकांना कर्ज देवून रकमेच्या सुरक्षेपोटी त्यांच्या जमीनीचे खरेदीदस्त लिहून घेत असतो. हे म्हणणे खरे नाही की, वादीस मी त्याच्या मागण्यानुसार ५ टक्के दराने १५,०००/–रु चे कर्ज दि.०६.१२.१९९९ रोजी साक्षीदार कृष्णा सौदागर लोंढे, रामा मारुती वेताळ, मोहन भागवत जाधन व तुळशीदास रामू पाटील यांच्यासमक्ष दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीस वर नमूद रक्कम व्याजाने दिल्यानंतर रकमेच्या सुरक्षेपोटी वाद जमीनीचे गहाणखत करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे व वादीमध्ये असे ठरले होते की वादीने रक्कम परत केलयानंतर खरेदीखत पलटून त्याच्या नावे करुन द्यायचे.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६.१२.२००५ रोजी वादीने वर नमूद रु. १५,०००/– व्याजासह मला परत दिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीने संपूर्ण रक्कम व्याजासह परत केल्यानंतर मी वाद जमीनीचे गहाणखत पलटून देण्यास टाळाटाळ करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, गहाणखत पलटून देण्याची गरज नाही, जमीन तुमच्याच नावे आहे, पुढे काही होणार नाही असे आश्वासन मी वादीला दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीदस्त नोंदविल्यानंतर त्या आधारे घेणा–याच्या नावे फेर मंजूर होण्याकरिता तसा अर्ज संबंधित तलाठयाकडे दिला जातो. वाद जमीनीचे खरेदीदस्त

झाल्यानंतर मी माझ्या नावे फेर मंजूर होण्याकरिता खरेदी तारखेच्या दोन महिन्यानंतर तलाठयाकडे अर्ज दिलो होतो. माझ्या नावे कोणत्या तारखेला फेर मंजूर झाला होता, ती तारीख मी पाहिलेली नाही. त्यानंतर मी वाद जमीनीचा ७/१२ कधी पाहिला होता, हे मला आज रोजी सांगता येणार नाही. आता मी वाद जमीनीचा ७/१२ उतारा पाहिलेला आहे. ७/१२ उता–यात माझ्या नावाची नोंद कधी झाली, हे मला आज रोजी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमीनीच्या ७/१२ उता–याबाबत माहिती नाही. सन २०१९ मध्ये माझ्या नावे ७/१२ वर नोंद झाल्याची मला माहिती झाली.

३. सध्या माझे गॅरेज एका ठिकाणी नसून मी मागील ७ ते ८ वर्षांपासून फिरुन लोकांच्या गाडया दुरुस्त करुन देतो. त्यापूर्वी मी शिवाजी चौकात असलेल्या स्वतःच्या मालकीच्या जागेत गॅरेजचे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्याव्यतिरिक्त माझ्या विरोधात परांडा न्यायालयात इतर दिवाणी दावे प्रलंबित होते. हे म्हणणे खरे नाही की, भीमसिंग ठाकूर यांनी माझ्या विरोधात अतिक्रमण केल्याबाबत दिवाणी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सावकारकीचा व्यवसाय करीत असल्याबाबत पोलीसांनी माझ्या घरातून कागदपत्र जप्त करण्यासाठी छापा टाकला होता. हे म्हणणे खरे नाही की, एसबीआय बँकच्या समोरील जागेत मी गॅरेजचा व्यवसाय करीत होतो, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गॅरेजसमोर जास्त गर्दी होवू लागली म्हणून मी दुसरी जागा बघण्यासाठी माझ्या मित्रांना सांगितले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद जागेच्या ७/१२ उता–यावर माझ्या नावाची नोंद न झाल्यामुळे वादी हा मला ब्लॅकमेल करु लागला होता, हे मी खोटे सांगत आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, दि.२८.०८.२०१९ रोजी वाद जागेवर माझ्या नावाची नोंद होण्याकरिता मी तलाठयाकडे अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार माझ्या नावे होत असताना वादीने हरकत नोंदविली होती. साक्षीदार स्वतः सांगतो की, वादीच्या मुलाने हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी वर नमूद अर्ज दिल्यांनतर वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद जमीन वादीच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीदस्त झाल्यानंतर मी साधारणतः २० वर्षानंतर माझ्या नावे फेर होण्यासाठी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की,

माझ्याकडून रक्कम उकळण्यासाठी वादीने खोटा दावा दाखल केला आहे, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.07.08 15:37:10 +0530

दिनांकः– ०८.०७.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. I. Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 08-07-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 08-07-2026 |
| Order uploaded on | - | 08-07-2026 |